# <u>प्रेस नोट</u>

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून राज्यातील अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेशासाठी MHT-CET ही राज्यशासनाची सामाईक प्रवेश परीक्षा घेण्यांत येणार आहे. शासनाने यासंबंधीचा शासन निर्णय दिनांक २८ ऑगस्ट २०१५ रोजी निर्गमित केला आहे. राज्यातील अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेशासाठी MHT-CET २०१६ ही प्रवेश परीक्षा देणे अनिवार्य आहे. MHT-CET सामाईक प्रवेश परीक्षा ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता १२ वी च्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल या प्रवेश परीक्षेकरीता तीन प्रश्न पत्रिका असतील. भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र या विषयाची प्रत्येकी ५० गुण असलेली सामायिक प्रश्नपत्रिका असेल तथापि गणित १०० गुण व जीवशास्त्र १०० गुण असलेल्या स्वतंत्र प्रश्नपत्रिका असतील. अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांचे अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेशासाठी च्या MHT-CET प्रवेश परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना एकच अर्ज भरावा लागेल.

अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमासाठीची गुणवत्ता यादी सामायिक प्रवेश परीक्षेतील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित या तीन विषयांच्या गुणांवर तयार करण्यांत येईल.

औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठीची गुणवत्ता यादी सामायिक प्रवेश परीक्षेतील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित/जीवशास्त्र या तीन विषयांच्या गुणांवर तयार करण्यांत येईल.

अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेसाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्याने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता १२ वी किंवा समकक्ष परीक्षेत भौतिकशास्त्र व गणित हे अनिवार्य विषय व रसायन/जीवशास्त्र/जैवतंत्रज्ञान/टेक्नीकल व्होकेशनल यापैकी एक विषयात एकुण किमान ५० टक्के (महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय व शारीरिक विकलांग विद्यार्थ्यांसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी विहित केलेल्या पात्रता निकषांची पूर्तता करणे आवश्यक असेल.